महाराष्ट्र गौण व्यापार नियमन योजनेत्तर योजनेमधील ४६४ अस्थायी पदांस सन २०१९-२० मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१९/प्र.क्र.१३४/फ-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०२ एप्रिल, २०१९

वाचा :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. गौणउ-२०१८/प्र.क्र.११२/फ-९, दिनांक ६.१०.२०१८
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.८/१८-१९/२०५२, दिनांक १४.२.२०१९
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. २१.२.२०१९

शासन निर्णय :-

महाराष्ट्र गौण व्यापार नियमन योजनेत्तर योजनेखाली निर्माण करण्यात आलेल्या ४६५ पदास दिनांक ०१.१०.२०१८ ते दिनांक २८.२.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास दिनांक ०६.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

वित्त विभागाने दिनांक २१.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

त्यानुसार, सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्र गौण व्यापार नियमन योजनेतर योजनेमधील ४६४ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ पासून दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास सोबत जोडलेल्या विवरण पत्रानुसार शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

या पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर), ०१ वनीकरण, १०५ वनउत्पादने, ०१ शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन, (०१) (०१) शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (तेंदू) (२४०६ ०४५२), (०१) वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० मध्ये उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि/२०१६-प्र१६/८.क्र./आ.पु.क, दिनांक २१.२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०३११४५०७१३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: CN = VIJAYKUMAR VASUDEO PATIL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2019.04.03 11:51:11 +05'30'

(वि.वा.पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म. रा., नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ट वनोपज, संनियंत्रण व मुल्यांकन), म. रा., नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर.
६. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. मुख्य वनसंरक्षक नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, औरंगाबाद, धुळे, नाशिक, वनवृत्त.
८. महालेखापाल १ / २ (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९. वित्त विभाग/ व्यय-१०, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
१०.फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग (निवड नस्ती)

शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण -२०१९/प्र.क्र.१३४/फ-९, दिनांक ०२ एप्रिल, २०१९

सोबतचे विवरणपत्र

(दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली पदे)

अ.क्र.	**पदनाम**	**एकूण**
१	**२**	**३**
१	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ट वनोपज, सनियंत्रण व मुल्यांकन)	१
२	कार्यालय अधिक्षक	८
२	लेखापाल	१
३	वनपाल	२२
४	वनरक्षक	३५९
५	लिपीक	६०
६	शिपाई	१२
७	सफाई कामगार (ठरावीक वेतन)	१
	एकूण	**४६४**

****